# आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितांमधील आशय व अभिव्यक्ती

**डॉ. उल्हास मोगलेवार,**
सहयोगी प्राध्यापक
संत गाडगेमहाराज महाविद्यालय, हिंगणा
९८२२५६८४३९
ulhasmoglewar@67gmail.com

........................................................................................................................

दोन हजार पाचशे वर्षापूर्वी भगवान गौतमबुद्धाने स्त्री—पुरूष समानतेचा विचार मांडला. त्यानंतर समाजपरिवर्तनाच्या चळवळीत महिलांचा सहभाग एकोणीसाव्या शतकात सुरू झाला असे म्हणावे लागते. या देशाच्या समाजव्यवस्थेत एकूण स्त्रीचे स्थान दलितच राहिले आहे.

सामाजिक निर्मात्या श्रीमती एव्हलीन राडे यांच्या मते सुमारे आठ हजार वर्षापूर्वीपर्यंत मातृप्रधान मानवसमाज अस्तित्वात होता स्त्रीया शेती, वैद्यकीयशास्त्र, विणकाम कौशल्य, मातीची भांडी, तसेच घरबांधणीच्या कामामध्ये कुशल होत्या. पुरूषांपेक्षा स्त्रीया अधिक स्वावलंबी होत्या आणि समाजामध्ये त्यांचे स्थान वरच्या दर्जाचे होते. अशातऱ्हेने अनादिकालापासून चालत आलेल्या स्त्री प्रधान संस्कृतीचा साधारणत: अडीच हजार वर्षापूर्वी अस्त होऊन तिच्या जागी पुरूषप्रधान कुटुंबव्यवस्था उदयाला आली. अशातऱ्हेने बहुतांशी देशातील समाजाने 'संस्कृतपणा'च्या उंबरठ्यावर पदार्पण केले. त्याचवेळी मालमत्तेच्या हक्काच्या प्रथेबरोबरच गुलामगिरीच्या प्रथेस व पुरूषप्रधान कुटुंबव्यवस्थेस सुरूवात झाली. त्यामुळे पती ही स्त्रीचा आश्रयदाता बनला व स्त्रीला गुलामाचा दर्जा प्राप्त झाला.

स्त्रीयांना न्याय मिळावा म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिलाचा आग्रह धरला. त्यासाठी सत्तेचा त्याग करण्यासाठी त्यांनी मागेपुढे पाहिले नाही स्त्री शिक्षणाचे महत्त्व त्यांनी ओळखले होते. एवढेच नव्हे तर कायद्याचे संरक्षणही तिला मिळायला पाहिजे असे त्यांचे मत होते हिंदू कोडबिलाद्वारे त्यांनी स्त्रियांना त्यांचे मूलभूत अधिकार मिळवून दिले व भारतीय स्त्रीच्या विकासाचा, प्रगतीचा, उन्नयनाचा मार्ग मोकळा करून दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळे स्त्री जागृत व संघटीत झाली एखाद्या समाजातील स्त्रियांच्या प्रगतीवरून त्या समाजाच्या प्रगतीचे मोजमाप करता येते असे त्यांचे मत होते. मुलांना शिक्षण द्या. महत्वाकांक्षी बनवा असे ते म्हणत असत. बाबासाहेबांनी दिलेल्या प्रत्येक लढ्यात दलित स्त्री त्याकाळात सहभागी झाली होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांतीकारी विचारांच्या चळवळीतून प्रेरणा घेऊन आत्मोद्धारासाठी अनेक दलित व सुधारक स्त्रिया समोर आल्या आणि शिक्षण घेऊन स्वाभिमानाने जगायला लागल्या जीवनातल्या प्रत्येक क्षेत्रात त्यांनी आपले श्रेष्ठत्व सिद्ध करायला सुरूवात केली. अनेक स्त्रियांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरापासून प्रेरणा घेऊन साहित्याच्या माध्यमातून समाजप्रबोधनाच्या कार्यात त्या सहभागी झाल्या दलित लेखकांच्या तुलनेत स्त्रियांची संख्या अतिशय कमी आहे. तरीसुद्धा त्यांचे लेखन सामाजिक जाणिवेतून झाले आहे. समाजाने ज्यांचे माणूसपण नाकारले आहे. त्यांना माणूस म्हणून जगण्याची संधी मिळवून देणारी सामाजिक परिस्थिती निर्माण झाली पाहिजे. हा या लेखिकांच्या जिवनाचा उद्देश होता दलित स्त्रियांनी निर्माण केलेल्या साहित्याचे अनुभव जिवंत व सच्चे आहेत. त्यांनी आपल्या जिवनात जे काही भोगले जे पाहिले तेच त्यांच्या साहित्यातून व्यक्त झाले आहे. दलित लेखिकांच्या लेखन कार्याचा विचार

करता असे दिसून येते की त्यांचे लेखन डॉ. बाबासाहेबांच्या धर्मांतरापूर्वीचे व धर्मांतरानंतरचे १९५६ ते आजपर्यंतचे दिसून येते. बाबासाहेबांच्या काळात स्त्रियांनी केलेले लेखन काहीशा ओबडधोबड स्वरूपात आढळून येते.

दलित महिला लेखिकात स्त्रीमुक्तीवर लिखाण करणाऱ्या ज्येष्ठ लेखिका कवयित्री श्रीमती सुगंधाबाई शेंडे या होत. त्यांचे बहुतेक लेखन गद्य तसेच कवितेच्या स्वरूपातील आहे. त्यांच्या 'प्रिय भगिनी' या कवितेत दलित स्त्रियांनी शिक्षण घेऊन अज्ञानाच्या गाढ निद्रेतून जागे व्हावे आणि एखाद्या पक्षाप्रमाणे गगनात स्वातंत्र्याची भरारी मारावी असे सांगितले आहे 'उठाव' या कवितेत दारूच्या व्यसनापायी दलित कुटुंब कसे उध्वस्त होते ते सांगून एका असहाय्य बहिणीची आपल्या भावांप्रती काळजी व्यक्त केली आहे. आपल्या कर्तव्याप्रती जागृत बहिणीचे या कवितेत चित्रण आले आहे.

यानंतरच्या दुसऱ्या महत्वाच्या कवयित्री म्हणजे हिरा बनसोडे आपल्या अनेक कवितेतून दलित समाजाचे दु:ख त्या व्यक्त करतात तसेच दलित स्त्रियांच्या वेदनासुद्धा त्या व्यक्त करतात. यशोधरा, डंख, फिर्याद व स्वातंत्र्य यांच्या कविता आहेत.

फिर्याद या कवितेविषयी त्या आपले मत व्यक्त करतांना म्हणतात ''लोकहो तुमच्या न्यायालयात मी फिर्याद आणली आहे. तुम्हीतरी मला न्याय द्याल का? पुढे त्या म्हणतात.

''आमची इज्जत लुटली जात आहे.
जातीयतेच्या धर्मांध व्यासपीठावर
आमचे शील जळत आहे
धर्माच्या पानांपानावर''
आपल्याच समाजबांधवांना आव्हान करतांना त्या म्हणतात
आतातरी डोळ्यावरची पट्टी उघडा
हा पराजीत इतिहास बदलण्यासाठी
आव्हान देणारे बलदंड हात
तुम्ही मला द्याल का?

दलित स्त्रियांचे प्रतिनिधित्व करतांना त्या म्हणतात तुमच्या न्यायालयात मी फिर्याद आणली आहे. तुम्ही मला न्याय द्याल का? आपल्याला होणारे दु:ख हृदयाशी न कवटाळता शब्दांत व्यक्त करण्याचा निर्भिडपणा त्यांनी दाखवला आहे.

यानंतरच्या आघाडीच्या कवयित्री ज्योती लांजेवार ह्या होत त्यांची कविता सामाजिक आशयांनी ओतप्रोत भरलेली दिसून येते. कारुण्याबरोबरच, त्वेष त्यांच्या कवितेत दिसून येतो त्यांच्या ''अशा अंगाईसाठी'' एक दलित गरीब स्त्री जेव्हा पोट भरण्यासाठी देहविक्रिचा व्यवसाय करते तेव्हा

आत तान्हुला रडतो
देह सजला माऊली
पान्हा चोळीत गळतो.

जीवनातील सत्य परिस्थितीचे वास्तव चित्रण त्याच्या कवितेत दिसून येते. सत्य परिस्थितीचे चित्रण करतांना आपल्या बाळाला अंगाई गित म्हणून त्या झोपवू शकत नाही म्हणून आपल्या मातृत्वाचा त्या धिक्कार करतांना म्हणतात.

अशा अंगाईच्यासाठी
वांझ राहिली असती
बाळा का आलास पोटी?

दारिद्र आणि उपेक्षेचे जीवन एका स्त्रीला कसे लाचार करून टाकते हे वास्तव चित्रण या कवितेत आले आहे. 'काळाची गरज' या कवितेत आपल्याच मुलीला उद्देशून त्या म्हणतात.

'मुली तुझे प्रसाधन आटोप लवकर
पदर खोच कमरेला
दारापुढे मोर्चा आहे.'

आपल्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराची दाद मागण्यासाठी आता घराचा उंबरठा ओलांडून बाहेर यायला पाहिजे असा निर्धार त्यांच्या या कवितेतून व्यक्त झाला आहे.

सुप्रसिद्ध कवयित्री डॉ. आशा थोरात यांच्या 'पानगळ' या काव्यसंग्रहात त्यांनी स्त्रियांचे दु:ख मांडले आहे. त्यांच्या अनेक कवितांमधून एका दलित स्त्रीची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांप्रती कृतज्ञता व्यक्त केलेली आढळून येते. आपली कृतज्ञता व्यक्त करतांना त्या म्हणतात —

''देव देव करता देवानं काय देल्ल
देवान काय देल्ल सारं जींन वाया गेल्लं।
आता घालू नका जोहार लागू नका पाया।
भीमरायानं लावला बुद्धांचा हा दिवा।

देव, दैव झुगारून ज्या भीमान ''माणूसपण'' मिळवून दिलं त्या भीमाने दाखविलेला बुद्धाचा मार्ग हाच आता आमचा स्वाभिमानाने जगण्याचा मार्ग आहेत. हा निर्धार व्यक्त करणाऱ्या जागृत स्त्रीचे चित्रण स्त्री मुक्ती संदर्भात अतिशय बोलके आहे. आशाताईंनी अनेक लोकगितातून स्त्रीमुक्तीच्या संदर्भात आपले महत्वाचे योगदान दिले आहे.

मीना गजभिये यांच्या कवितेतसुद्धा स्त्रीमनाचे विदारक चित्रण आले आहे. आपल्या कवितेत त्या आपले मत व्यक्त करतांना म्हणतात —

'कितीतरी स्त्रियांचे वस्त्रहरण झाले
अजून कुणीच कसा कृ ण आला नाही'

असा प्रश्न त्या समाजमनाला करतांना दिसतात तसेच आमचा उद्धार आपणच केला पाहिजे. हा आत्मोद्धाराचा सल्लासुद्धा त्यांनी दिला आहे.

याशिवाय एक आघाडीची कवयित्री म्हणजे सुरेखा भगत यांचे नाव घेतले जाते सामाजिक बांधीलकीची जाणीव ठेवून त्यांच्या कविता निर्माण झाल्या आहे. काव्यांच्या प्रांतात त्यांच्या प्रकाशित काव्यसंग्रहामुळे त्यांचे स्थान लक्षणीय ठरले आहे त्यांचा 'साक्ष' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे.

याशिवाय दलित कवितेच्या तिसऱ्या पिढीचे प्रतिनिधित्व करणारी कवयित्री प्रज्ञा लोखंडे यांचे नाव गाजले आहे. स्त्रीच्या दु:खाला अंत:करणातून अधोरेखित करणारी ही कवयित्री आहे. एका नव्या दृष्टीकोनातून लिहिणारी तिचे लेखन स्त्रीमुक्तिच्या पोषक विचारांना चालना देणारे आहे म्हणूनच तिच्या काव्यातून मांडलेला विचार समाजाच्या सर्व स्तरातील स्त्रीपुरू ाात जाणीव जागृती निर्माण करणारा ठरतो. प्रज्ञा लोखंडेप्रमाणे दलित कवितेच्या तिसऱ्या पिढीचे प्रतिनिधित्व करणारी औरंगाबादची प्रज्ञा अहिरे ही

कवयित्री सुद्धा आपल्या डोळ्यासमोर उभी राहते डॉ. बाबासाहेबांच्या स्त्री—पुरूष समतेचे आणि त्या समतेतून निर्माण झालेल्या आत्मभानाचे चित्रण प्रतिभा अहिरे यांच्या कवितेतून दिसून येते. त्यांचे लेखन मनाला अंतर्मुख करणारे आहे. पुरूषाप्रमाणे स्त्रियांना आपल्या अस्मितेची जाणीव करून देणारे आहे. याशिवाय अलका चंद्रशेखर यांच्या 'मुक्या पाखराचे थवे' या काव्य संग्रहातूनही त्यांच्या स्त्रिमुक्तीच्या संदर्भातले योगदान महत्त्वपूर्ण असे आहे. याशिवाय मलकापूर येथील रहिवासी झिंगुबाई बोलके यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातून प्रेरणा घेऊन ग्रामीण भागाचे प्रतिनिधित्व केले आहे. त्यांची गित खूपच बोलकी आहे. 'उजेडाची गाणी' आहेत डॉ. बाबासाहेबांप्रती कृतज्ञता त्यांच्या गितांतून व्यक्त झाली आहे. ग्रामीण भागाचे प्रतिनिधित्व करणारी त्यांची गित स्त्रिशक्तीला आव्हान करणारी अशीच आहेत.

याशिवाय जखमांची सोबत करून खचून न जाणारी कवयित्री म्हणजे डॉ. सरिता जांभुळे होय त्यांच्या काव्यातून सावित्रीबाई फुले, ज्योतीबा फुले डॉ. बाबासाहेब आंबेडकर, रमाआई यांच्याबद्दल श्रद्धाभाव व्यक्त झाला असून त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा गौरव करण्याबाबत त्यांनी प्रबोधन केले आहे. पिढयानपिढया मुक्याने जगलो पण आता मुके रहायचे नाही. प्रकाशाच्या दिशेने केवळ चालायचे नाही तर धावायचे आहे असा आशावाद कवयित्री व्यक्त करतांना दिसते. 'घरकुल जखमांचे' हा त्यांचा काव्यसंग्रह होय.

स्त्रीमुक्तीच्या संदर्भात लेखन करणाऱ्या सर्व कवयित्री या बहुतेक महाराष्ट्रातील आहे बहुतेक स्त्री लेखिका या अस्मितादर्श परिवारातील आहे. अस्मितादर्श ही साहित्यिकांची एक नवी परिवर्तनवादी बुद्ध, फुले आंबेडकरांच्या मानवतावादी विचारांशी बांधिलकी मानणारी पिढी तयार करणारी साहित्यिक व सांस्कृतिक चळवळ आहे. या चळवळीने दलित लेखिकांना नवा आत्मविश्वास मिळवून दिला आहे.

याशिवाय नागपूरातील हिंदीच्या प्रख्यात कवयित्री प्रा. सुशीला टाकभौरे या असून त्यांचे 'तुम भी उसे जानो' 'तुमने उसे कब पहचाना' हे त्यांचे काव्यसंग्रह बाबासाहेबांच्या मानवमुक्तीच्या चळवळीचे आणि स्त्रीमुक्तीचे दर्शन घडविणारा आहे. मुंबईच्या उषा आंभोरे यांचा 'हुंकार वेदनेचे' हा काव्यसंग्रह तर स्त्रीमनाच्या वेदनांना वाचा फोडणारा आहे.

१४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना बौद्ध धम्माची दीक्षा घेतली आणि नंतर पाच लाख अनुयायांना धम्मदीक्षा दिली. बाबासाहेबांच्या धर्मांतरामुळे दलित स्त्रीमध्ये मानसिक सामाजिक वैचारिक परिवर्तन घडून आले. स्त्रीची अस्मिता जागृत झाली. व मान उंच करून ती डोळसपणे जगाकडे पाहू लागली. हिंदुधर्मातील देवदेवता अंधश्रद्धा, जुन्या रूढी, जातपात, अस्पृश्यता, अनिष्ट प्रथा, परंपरा व्रतवैकल्ये या सर्वांचा त्याग तिने केला. बुद्धधर्मात स्त्रीयांचे स्थान कोणते? हे जाणून घेण्याच्या जिज्ञासेपोटी ती वाचन मनन चिंतन करू लागली. आत्मविश्वासाने आंबेडकर चळवळीत कार्य करीत असतांना समाज—प्रबोधन व धम्म प्रसाराचे ध्येय बाळगून नुसत्या मुंबईत व वस्त्यावस्त्यात दोनशे महिलामंडळे स्थापन झाली. धर्मातरानंतरची स्त्री लिहू लागली, साहित्यातून व्यथा, वेदना मांडायला लागली. आजवर तिच्या जीवनाची कोंडी झाली होती. आंबेडकरी चळवळीने तिला जागृत केले होते. नवचैतन्य दिले होते. ती व्यासपीठे गाजवू लागली. राजकीय क्षेत्रातही तिची वाटचाल सुरू झाली. सौ. मिनाम्बल शिवराज मद्रास महानगरपालिकेची पहिली महापौर होती. मंत्रिमंडळात सुद्धा स्त्रिया विविध पदे भुषवू लागल्या डॉक्टर, इंजिनियर, प्रोफेसर, ऑफिसर होऊ लागल्या. काही स्त्रिया भिक्षुणी झाल्या व पूर्णवेळ समाजकार्य व धम्मकार्य करू लागल्या.

स्त्रीयांची अस्मिता जागृत झाल्यावर परिवर्तन घडणे अपरिहार्य होते नाशिकच्या काळाराम मंदिर सत्याग्रहात एका तुकडीचे नेतृत्व सौ. गीताबाई गायकवाड यांनी केले तर नागपूरच्या जाईबाई चौधरी आणि अंजनाबाई देशभ्रतार यांनी अस्पृश्य मुलींसाठी १९२४ साली संत चोखामेळा शाळा व मागासवर्गीय मुलींसाठी होस्टेल काढून हजारो मुलींना शिक्षण दिले. सुंगधाबाई शेंडे यांनी नागपूरला Depressed Class मुलींचे होस्टेल चालविले. नागपूरच्या राधाबाई कांबळे, जाईबाई चौधरी, सुलोचना डोंगरे, बेबीताई कांबळे यांनी आंबेडकरी चळवळ त्याचप्रमाणे स्त्रीमुक्ती चळवळ पुढे नेण्यास मदत केली.

साहित्यिक क्षेत्रातसुद्धा स्त्रियांनी गरूडभरारी घेतलेली दिसून येते बेबीताई कांबळे, प्रा. कुमुद पावडे, मुक्ता सर्वगोड, शांताबाई कांबळे, शांताबाई दाणी, श्रीमती जोंधळे, नलिनीताई लढलो यांनी आत्मचरित्रे लिहून आपले व समाजाचे दु:ख वेशिवर टांगले तर कथा, कादंबऱ्या, संशोधनपर वैचारिक लेखन, कविता, नाटके यामध्ये दलित व बौद्ध महिला अग्रेसर होत्या.

याशिवाय प्रा. सुशिला मूलजाधव, प्रा. कुमुद पावडे, हिश बनसोडे, सुगंधा शेंडे, डॉ. अरूणा लोखंडे, डॉ. ज्योती लांजेवार, डॉ. आशा थोरात, उर्मिला पवार, मिनाक्षी मून, सुरेखा भगत, डॉ. कुसुम मेघवाल, ॲड. सुलेखा कुंभोर, प्रा. नंदा कांबळे, मीना गजभिये, नंदा तायवाडे, प्रा. प्रज्ञा लोखंडे या स्त्रियांनी लेखनाबरोबर सभा संमेलने, परि ादा यामधून चळवळीचा प्रसार—प्रचार करण्याचे उल्लेखनीय कार्य केले आहे.

**संदर्भ ग्रंथ :—**

१. प्रतिभा रानडे.स्त्री मुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊलखुणा
२. आम्ही मैतरणी, फुले आंबेडकर शताब्दी स्त्री विशेषांक १९९२, वर्ष १ ले, अंक १ ला जाने—फेब्रु—मार्च पृ. ६३.
३. खैरमोडे, चा. भ. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पृ. ६६ खंड १ (ब).
४. पवार उर्मिला, मून मिनाक्षी, आम्ही ही इतिहास घडवला.
५. गवाणकर डॉ. रोहिणी, डॉ. आंबेडकर स्त्रीमुक्तीचे कार्य